## निवडक

### ‘सम्राट संगीत सितारा २०२५’साठी १४ जून पासून प्राथमिक निवड चाचणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १०** : सम्राट क्लब इंटरनॅशनल राज्य १तर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या अत्यंत प्रतिष्ठेच्या अशा सम्राट संगीत सितारा २०२५ या सीजन १९ च्या स्पर्धेसाठी प्राथमिक फेरीला दि. १४ जून पासून सुरुवात होणार आहे. सावंतवाडी, बेळगाव, उत्तर गोवा व दक्षिण गोवा अशा चार केंद्रांमध्ये ही प्राथमिक फेरी घेण्यात येणार आहे.

या स्पर्धेची उपांत्य फेरी १९ जून रोजी कुडचडे रवींद्र भवनात तर अंतिम फेरी ६ जुलै रोजी साखळी रवींद्र भवन येथे होणार आहे, अशी माहिती सम्राट संगीत सिताराचे चेअरमन अमोल बेतकीकर यांनी दिली.

या स्पर्धेसाठी सर्वप्रथम सावंतवाडी केंद्रात १४ जून रोजी सकाळी १० वाजता स्पर्धकांची प्राथमिक फेरी घेण्यात येणार आहे. त्यानंतर १५ जून रोजी सकाळी १० वाजता बेळगाव केंद्रात, २१ जून रोजी संध्याकाळी ३ वाजता उत्तर गोवा केंद्रात तर २२ जून रोजी संध्याकाळी ३ वाजता दक्षिण गोवा या केंद्रामध्ये घेण्यात येणार आहे.

या स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक रु. २५ हजार, चषक व सतीश माशेलकर पुरस्कृत २४ कॅरेट सोन्याचे नाणे, द्वितीय पारितोषिक रु. २० हजार चषक व सुवर्ण नाणे, तृतीय पारितोषिक रु. १५ हजार, चषक व सोन्याचे नाणे, चौथे, पाचवे व सहावे बक्षीस रू. ५ हजार, चषक व चांदीची गणपती फ्रेम देण्यात येईल.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी वरील चार पैकी कोणत्याही केंद्रामध्ये आपली नोंदणी करण्याची मुभा आहे. ही नोंदणी निशुल्क असून आपली नोंदणी अर्ज ६ जून पूर्वी आयोजकांकडे सुपूर्द करावी. ही स्पर्धा १४ ते २५ वर्षे वयोगट या वयोगटातील कलाकारांसाठी असून स्पर्धकांना आपल्या वयाचा योग्य दाखला सादर करावा लागेल. स्पर्धेत हिंदी, मराठी व कोकणी यापैकी कोणत्याही भाषेतील गीत सादर करता येईल. स्पर्धेत शुद्ध शास्त्रीय संगीत सादर करणे बंधनकारक असून त्यात राग, चीज, बंदिश, ख्याल, छोटा यांचा समावेश असू शकतो. या गीतांसाठी स्पर्धकाला ८ ते १२ मिनिटांचा अवधी दिला जाईल. स्पर्धकांनी आपले प्रवेशिका वरील चारही केंद्रच्या यजमान क्लबांकडे सुपूर्द करावी. यापैकी एकूण १२ स्पर्धक हे उपांत्य फेरीसाठी निवडले जातील तर ६ स्पर्धक साखळी रवींद्र भवन येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी निवडले जातील, असे या स्पर्धेसाठी नियम असल्याचे संगीत सितारा २०२५ चे चेअरमन अमोल बेतकीकर यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी अमोल बेतकीकर (मो. क्र. ७०३८८६८४१८) यांच्याशी संपर्क साधावा.

---

### युगनायकतर्फे उद्या बुद्ध जयंती सोहळा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १० :** जगाला प्रज्ञा, करुणा व शिल याच बरोबर शांतीचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीचा सोहळा युगनायक गोवा या सामाजिक संस्थेतर्फे सोमवार दि. १२ रोजी सकाळी १०.३० वाजता लेक्चर हॉल कला व संस्कृती भवन पणजी येथे साजरा करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून डॉ. चंद्रकांत परुलकर खास कणकवली, महाराष्ट्र येथून लाभणार आहेत. तर सन्माननीय पाहुणे म्हणून त्रिरत्न बौद्ध महासंघाचे धम्मचारी प्रज्ञा चक्षू उपस्थित असतील, कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मिलिंद माटे असणार आहेत. तरी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे निवेदन युगनायक आयोजकांकडून करण्यात आले आहे.

---

### नायल बोरी क्रिकेट क्लबतर्फे १९ पासून राज्यस्तरीय आमदार चषक क्रिकेट स्पर्धा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**बोरी, दि. १०** : बोरी येथील नायल बोरी क्रिकेट क्लब व शिरोडा ग्रामपंचायत, बोरी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय सिझनबॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे स्पर्धा आमदार चषक म्हणून ओळखली जाईल एकुण २० षटकांच्या स्पर्धेत विजेत्यांना रोख रु ५० हजार व आमदार चषक तर उपविजेत्याला रोख रु.३० हजार व चषक उपांत्य फेरीत पराभूत संघाला प्रत्येकी १० हजार रुपये देण्यात येईल,या व्यतिरिक्त ऊत्तकृष्ट फलंदाज, गोलंदाज, मालिकाविर व प्रत्येक सामन्यात सामनावीर म्हणून आकर्षक बक्षिसे देण्यात येणार सदर स्पर्धा सहकार मंत्री सुभाष शिरोडकर , बोरी पंचायत शिरोडा पंचायत यांनी पुरस्कृत केली आहे.शिरोडा काराय येथील सुभाषचंद्र बोस मैदानावरील टर्फ खेळपट्टीवर सकाळी ९ वाजता व दुपारी २:०० वाजता दिवसा प्रत्येकी दोन सामने खेळवीले जाईल, सदर स्पर्धेत फक्त गोव्यातील १६ संघांना व खेळाडुंना प्रवेश दिला जाईल, अधिक माहिती साठी किंवा नावनोंदणी साठी खजिनदार तृप्तेश फडते९९२३१९१८८२ किंवा अध्यक्ष पिटर मेंडिस ८८०६४५१६५९ यांच्यांशी संवाद साधावा.

# ‘आयपीएल २०२५’चे पुढचे सामने कुठे होणार !

## उर्वरीत सामने बंगळुरू, चेन्नई व हैदराबाद शहरांत खेळवण्याचा बीसीसीआयचा निर्णय

**नवी दिल्ली, दि. १० :**

आयपीएल २०२५ ही स्पर्धा रद्द केली नव्हती तर ती स्थगित करण्यात आली होती. त्यामुळे आता आयपीएलचे पुढचे सामने येत्या काही दिवसांतच होणार आहेत. पण हे सामने कुठे होणार हे आता स्पष्ट करण्यात आले आहे. आयपीएलचे उर्वरीत सामने हे तीन शहरांमध्ये होणार असल्याचे आता समोर आले आहे.

भारताच्या सीमारेषेवर तणावाचे वातावरण आहे. त्यामुळे आता पंजाब, धरमशाला येथे सामने होणार नाहीत, असे बीसीसीआयचे स्पष्ट केले आहे. कारण जी शहरे सीमारेषेजवळ आहेत, तिथे आता आयपीएलचे सामने होणार नाही. त्यामुळे आता बीसीसीआयने तीन अशी शहरे निवडली आहेत की जिथे चोख व्यवस्था मिळू शकते आणि कोणतीही समस्या जाणवणार नाही.

बीसीसीआयने आता एक गोष्ट स्पष्ट केली आहे. जिथे कोणतीही समस्या जाणावणार नाही, तिथे आयपीएलचे सामने खेळवायचे. त्यासाठी आता बीसीसीआयने दक्षिण भारताची निवड केली आहे. कारण दक्षिण भारत हा सीमारेषेपासून लांब आहे आणि तिथे चोख सुरक्षा व्यवस्थाही मिळू शकते. त्यामुळे आता आयपीएलचे उर्वरीत सामने हे बंगळुरू, चेन्नई आणि हैदराबाद या तीन शहरांमध्ये खेळवण्याचा निर्णय आता बीसीसीआयने घेतल्याचे समोर आले आहे. आयपीएलचे सामने हे आता फक्त तीन शहरांत होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.



पाकिस्तानविरुद्धच्या वाढत्या लष्करी तणावामुळे भारतीय क्रिकेट बोर्डाने शुक्रवारी आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धा एका आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता. 'बीसीसीआयने आयपीएल २०२५चा उर्वरित मोसम तातडीने आठवडाभरासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. परिस्थितीचा आढावा आणि सरकारशी चर्चा करूनच पुढील कार्यक्रम निश्चित केला जाईल', असे बीसीसीआयचे चिटणीस देवाजित सैकिया यांनी पत्रकाद्वारे कळविले होते. यामुळे शुक्रवारी रंगणाऱ्या लखनऊ सुपर जायंट्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू या सामन्यापासून पुढील स्पर्धा स्थगित झाली आहे. पण आता आयपीएलचे सामने कुठे होणार हे समोर येत आहे.

आयपीएलचे उर्वरीत सामने हे आता चेन्नई, बंगळुरू आणि हैदराबाद येथे खेळवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पण हे सामने कधीपासून सुरु होतील, याची माहिती मात्र मिळू शकलेली नाही. त्याचबरोबर कोणत्या शहरात सामने खेळवले जातील, याबाबत बीसीसीआय लवकरच आपला निर्णय जाहीर करणार असल्याचे आता समजते आहे. त्यामुळे आता बीसीसीआय या गोष्टी नेमक्या कधी जाहीर करणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

**नवीन वेळापत्रकामुळे मुंबई इंडियन्सचे नुकसान**

आयपीएलचे नवीन वेळापत्रक आता बीसीसीआय लवकरच जाहीर करणार आहे. पण या नवीन वेळापत्रकामुळे मुंबई इंडियन्सला मोठा नुकसान होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता हार्दिक पंड्याची चिंता चांगलीच वाढलेली आहे.

आयपीएल ही रद्द झालेली नाही तर स्थगित करण्यात आली आहे. एका आठवड्याने आयपीएल खेळवण्यात येऊ शकते, असे समोर आले आहे. पण आता आयपीएल ही सर्व शहरांत होणार नाही. कारण भारताच्या सीमेवर तणावाचे वातावरण आहे, तर काही शहरांमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आले आहेत. त्यामुळे आता पुढील आयपीएलचे सामने निवडक तीन शहरांमध्ये खेळवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# नीरज चोप्रा क्लासिक स्पर्धाही स्थगित

**नवी दिल्ली, दि. १० :**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणाव आता शिगेला पोहचला आहे. पाकिस्तानला ठेचल्यानंतरही त्यांच्या कुरापती सुरुच आहेत. दुसऱ्या देशांकडून कर्ज मागण्याची वेळ ओढावलेली असतानाही पाकिस्तान धजावत नाहीय. पाकिस्तान भारतावर हल्ले करण्याचे प्रयत्न करत आहे. पाकिस्तानकडून वारंवार नागरी वस्त्यांवर हल्ला केला जात आहे. या साऱ्या स्थितीचा परिणाम हा दोन्ही देशातील क्रीडा वर्तुळावरही झालेला पाहायला मिळत आहे. आयपीएल आणि पीएसएल या दोन्ही स्पर्धा स्थगित करण्यात आल्या आहेत. आयपीएल २०२५ आठवड्याभरासाठी स्थगित करण्यात आला आहे. अशात आता भारताचा गोल्डन बॉय नीरज चोप्रा यालाही भारत-पाकिस्तान तणावाचा फटका बसला आहे.

बंगळुरूत येत्या २४ मे रोजी ‘नीरज चोप्रा क्लासिक’ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र युद्धभूमीवर सुरू असलेल्या कारवायांमुळे नाईलाजाने ही स्पर्धा स्थगित करण्यात आली आहे. नीरज चोप्रासह या स्पर्धेत अनेक आंतरराष्ट्रीय भालाफेकपटू सहभागी होणार होते. मात्र खेळाडूंच्या सुरक्षितता हे आमचे प्राधान्य आहे. त्यामुळे ही स्पर्धा स्थगित करण्यात येत असल्याची माहिती आयोजकांकडून सोशल मीडियावरुन देण्यात आली. तसेच भारतीय सैन्याला आमचा संपूर्ण पाठींबा आहे. लवकरच या स्पर्धेसाठी पुढील तारीख जाहीर करण्यात येईल, असेही आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.




नीरज चोप्रा क्लासिक स्पर्धेचे आयोजन हे फक्त एक दिवसच करण्यात आले होते. या स्पर्धेत २ वेळा विश्वविजेता असणारा ग्रेनेडाचा अँडरसन पीटर्स, जर्मनीचा ऑलिम्पिक पदकविजेता थॉमस रोलर, यूलियस येगो आणि अनेक दिग्गज भालाफेकपटू स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

नीरच चोप्राने या स्पर्धेसाठी ऑलिम्पिकमधील सुवर्ण पदकविजेत्या अर्शद नदीम यालाही निमंत्रित केले होते. मात्र अर्शद नदीम याने आगामी आशियाई एथलेटिक्स चॅम्पियनशीप स्पर्धेमुळे नकार दिला. अर्शदला निमंत्रित केल्याने नीरज चोप्रा याला ट्रोल करण्यात आले होते.

दरम्यान जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २६ पर्यटकांचा दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झाला होता. भारताने या दहशतवादी हल्ल्याला ‘ऑपरेशन सिंदूर’द्वारे चोख उत्तर दिले. तेव्हापासून दोन्ही बाजूने यूद्धभूमीवर संघर्ष पाहायला मिळत आहे. मात्र भारताने पाकिस्तानचे अनेक हल्ले परतवून लावत चोख उत्तर दिलं आहे.

# उन्नती हुडा, आयुष शेट्टी तैपेई ओपनच्या उपांत्य फेरीत

**तैपेई, दि. १० :**

तैपेई ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत युवा भारतीय शटलर आयुष शेट्टी आणि उन्नती हुड्डा यांनी आपली छाप सोडली नाही. शुक्रवारी तैपेई येथे झालेल्या पुरुष आणि महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत त्यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना हरवून तीन सामन्यांच्या कठीण लढतीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. २०२२ ओडिशा मास्टर्स आणि २०२३ अबू धाबी मास्टर्स चॅम्पियन उन्नतीने महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत स्थानिक शटलर हंग यी-टिंगचा २१-८, १९-२१, २१-१९ असा पराभव करून ५२ मिनिटे संघर्ष केला.

तत्पूर्वी, १७ वर्षीय भारतीय खेळाडू, जी तिच्या प्रतिस्पर्ध्याच्या ६५ व्या स्थानावर असताना, जागतिक क्रमवारीत ५३ व्या स्थानावर होती, तिने १६ व्या फेरीत तैपेईची आणखी एक शटलर लिन सिह युन हिला २१-१२, २१-७ असे हरवले.





तिचा पुढील सामना जपानच्या अव्वल मानांकित तोमोका मियाझाकीशी होईल. जपानी खेळाडूने दुसऱ्या क्वार्टरफायनलमध्ये तैपेईच्या हसियांग लिनचा १७-२१, २१-८, २१-१७ असा पराभव केला. २०२३ च्या जागतिक ज्युनियर अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेता २० वर्षीय आयुषने दुसऱ्या फेरीत कडव्या संघर्षात सिनिअर प्रो किदाम्बी श्रीकांतवर मात केली. त्याने कॅनडाच्या सातव्या मानांकित ब्रायन यांगला १६-२१, २१-१९, २१-१४ असे पराभूत करून एक तास ११ मिनिटे चाललेल्या या सामन्यात अंतिम चारमध्ये प्रवेश केला.

ऑल इंग्लंड चॅम्पियनशिपच्या उपविजेत्या ली चिया हाओला पहिल्या फेरीत पराभूत करणारा हा उदयोन्मुख भारतीय खेळाडू पुढील फेरीत अव्वल मानांकित चायनीज तैपेईचा चाउ तिएन चेन आणि इंडोनेशियाचा मोह झाकी उबैदिल्ला यांच्यातील दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यातील विजेत्याशी सामना करेल.

# तिरंदाजी विश्वचषक स्टेज-२ मध्ये भारतीय संघाला तीन पदके

## पुरुषांच्या कंपाउंड संघाने सुवर्ण आणि महिलांनी रौप्यपदक जिंकले : मिश्र प्रकारात कांस्यपदक

**शांघाय, दि. १० :**

स्वप्नवत पुनरागमन करताना, मधुरा धामणगावकरने तिचे पहिले वैयक्तिक विश्वचषक सुवर्णपदक जिंकले आणि शनिवारी येथे आर्चरी स्टेज २ शोपीसमध्ये कंपाउंड विभागात भारताच्या चमकदार पदकांच्या संग्रहात आघाडी घेतली - दोन सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्य.

तीन वर्षांपासून बाजूला राहिल्यामुळे क्रमवारीत नसलेल्या मधुराने अंतिम फेरीत एक खळबळजनक सुधारणा केली, अमेरिकेच्या कार्सन क्रेहला १३९-१३८ असा पराभव करून अव्वल पोडियमवर शिक्कामोर्तब केले.

महाराष्ट्रातील अमरावतीच्या २४ वर्षीय मधुराने यापूर्वी एक सांघिक रौप्य आणि एक मिश्र सांघिक कांस्यपदक जिंकले होते, ज्यामुळे तीन पदकांची उत्कृष्ट कामगिरी झाली.

तथापि, मधुराचा वैयक्तिक अंतिम सामना रोलर-कोस्टर होता. तिने दोन एक्ससह परिपूर्ण ३० सह सुरुवात केली, परंतु दुसऱ्या टोकावर दोन ८ आणि तिसऱ्या टोकावर महागड्या ७ सह ती ८१-८५ ने पिछाडीवर पडली. ५२ व्या क्रमांकावर असलेल्या आणि गेल्या वर्षी विश्वचषक संघाच्या कांस्यपदक विजेत्या क्रेहेने तिसऱ्या टोकावर परिपूर्ण ३० गुणांसह खेळ केला. हार न मानता, मधुराने पोलादी धाडस दाखवले, चौथ्या टोकावर जवळजवळ निर्दोष २९ गुणांसह सामना ११०-११० असा बरोबरीत आणला. निर्णायक अंतिम टोकावर, तिने दोन एक्स आणि एक ९ गुणांसह खेळ केला, तर क्रेहेने



केवळ २८ गुणांसह मधुराचा नाट्यमय एक गुणांचा विजय मिळवला. तत्पूर्वी, भारताच्या पदकतालिकेची सुरुवात पुरुषांच्या सांघिक स्पर्धेत सुवर्णपदकाने झाली, जिथे अनेक विश्वचषक सुवर्णपदक विजेत्या अभिषेक वर्मा, ओजस देवताळे आणि ऋषभ यादव या त्रिकुटाने तणावपूर्ण अंतिम सामन्यात मेक्सिकोचा २३२-२२८ असा पराभव केला.

अव्वल मानांकित भारतीय संघाने ५९ गुणांसह मेक्सिकोच्या ५७ गुणांसह चांगली सुरुवात केली, परंतु अर्ध्या टोकापर्यंत सामन्याची पातळी ११५-११५ अशी होती.

तिसऱ्या टोकावर ५८ गुणांसह भारताने नियंत्रण मिळवले आणि शेवटच्या टोकावर ५९ गुणांसह विजयावर शिक्कामोर्तब केले, तर मेक्सिकोला फक्त ५६ गुण मिळू शकले.

२२ वर्षीय यादवने आपले पहिले वैयक्तिक विश्वचषक पदक जिंकले आणि दक्षिण कोरियाच्या किम जोंगोचा १४५-१४५ (१०*-१०) असा नाट्यमय शूट-ऑफमध्ये पराभव करून कांस्यपदकासाठी आपले नाव कोरले.

पहिल्या टोकानंतर आघाडी घेतल्यानंतर, यादवने पुढील दोन गमावले परंतु परिपूर्ण ३० गुणांसह पुनरागमन केले आणि ११५-११५ असा गुण मिळवला. दोन्ही तिरंदाजांनी शेवटच्या टोकावर निर्दोष ३० गुणांसह धावा केल्या, परंतु शूट-ऑफमध्ये यादवचा बाण केंद्राच्या जवळ होता. यापूर्वी यादवला जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आणि नेदरलँड्सच्या अनेक विश्वविजेत्या माइक श्लोसरकडून १४४-१४७ असा पराभव पत्करावा लागला.

भारतीय पात्रता फेरीत अव्वल स्थान पटकावण्यासाठी तिसरे मानांकन मिळवणाऱ्या मधुराने तिच्या वैयक्तिक मोहिमेची सुरुवात तुर्कीच्या जागतिक क्रमवारीत १३ व्या स्थानावर असलेल्या हजल बुरुनला - जी दुहेरी विश्वचषक संघ पदक विजेती होती - नॉकआउट करून केली. तिने दोन निर्दोष सुरुवातीच्या खेळांवर आधारित १४३-१४१ असा संयमी विजय मिळवला.

महिला संघाच्या अंतिम फेरीत, मधुराने ज्योती सुरेखा वेन्नम आणि चिकिथा तनिपार्थी यांच्यासोबत भागीदारी करून रौप्यपदक पटकावले. एका बाजूने झालेल्या निकालानंतरही, भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत आशादायक कामगिरी केली. कमी स्कोअरिंग प्लेऑफमध्ये मलेशियाचा १४४-१४२ असा पराभव करून मधुराने वर्मासोबत मिश्र संघ कांस्यपदक मिळवले.

हे निकाल जागतिक स्तरावर कंपाऊंड तिरंदाजीमध्ये भारताची वाढती खोली आणि सातत्य अधोरेखित करतात. २०२८ च्या लॉस एंजेलिस गेम्समध्ये एकाच मिश्र सांघिक स्पर्धेत कंपाऊंड तिरंदाजी ऑलिंपिक पदार्पण करणार असल्याने, भारताचे लक्ष या खेळातील पहिले ऑलिंपिक पदक मिळविण्यावर असेल. रविवारी दुसऱ्या टप्प्याच्या शेवटच्या दिवशी रिकर्व स्पर्धा होणार आहेत, ज्यामध्ये भारत आणखी तीन पदकांच्या शोधात आहे. भारतीय पुरुष संघ कांस्यपदक प्लेऑफमध्ये भाग घेईल, तर पार्थ साळुंखे आणि दीपिका कुमारी उपांत्य फेरीतून त्यांच्या मोहिमांची सुरुवात करतील.

# युनायटेड शिक्षा व्हिजनतर्फे ‘लाटंबार्से प्रीमियर लीग २०२५’

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १०** : क्रिकेटमध्ये उत्कृष्ट कामगिरी करू इच्छिणाऱ्या आणि राज्य आणि देशाचे प्रतिनिधित्व करण्यास उत्सुक असलेल्या नवोदित क्रिकेटपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी युनाइटेड मेणकुरेतर्फे लाटंबार्से लीगचे आयोजन केले आहे. १९ वर्षांखालील मुलांचे मनोबल वाढवण्यासाठी व क्रिकेट क्षेत्रात त्यांची गुणवत्ता सिद्ध करताना त्यांचा सहभाग अनिवार्य करून युवा खेळाडूंना विशेष संधी देण्याचा प्रयत्न केला आहे.

लिलाव प्रक्रियेद्वारे लाटंबार्से, साळ, मेणकुरे- धुमासे, अडवलपाल आणि मुळगाव या पाच गावांतील खेळाडूंनी लीगमध्ये भाग घेतला आहे. लीगमध्ये सहभागी आठ संघ सहभागी होत आहेत. माजी आमदार राजेश पाटणेकर यांच्या माध्यमातून जीसीएने दिलेल्या पाठिंब्याबद्दलत्यांचे आयोजकांनी विशेष आभारव्यक्त केले आहेत.

युनायटेड मेणकुरे, शिक्षा व्हिजन आणि आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांच्या सहकार्याने ही लीग आयोजित केली आहे. लीगमध्ये आठ संघ सहभागी आहेत आणि १५ सामने खेळवले जातील. हे सामने साळ व मेणकुरे मैदानावर होतील. या लीगचा प्रारंभ माजी सभापती गोवा क्रिकेट संघटनाचे सदस्य राजेश पाटणेकर, आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत करण्यात आला.




RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २४८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 248 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .